## नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ०५/०७/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **जुलै महिन्याची सर्वसाधारण मासिक सभा, शुक्रवार, दिनांक १२ जुलै २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. इतिवृत्त कायम करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

३. बेलापूर विभागामधील नेरुळ सेक्टर-४८ भुखंड क्र.२२ येथे नागरी आरोग्य केंद्रासाठी इमारत बांधणे.

४. नमुंमपाच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक पर्यावरण स्थिती दर्शक अहवालास मंजूरी मिळणे.

५.नमुंमपामध्ये अजेंडा मॅनेजमेंट संगणक प्रणाली व अँड्राईड बेस्ड ॲप्लिकेशन विकसित करणे, पाणीपुरवठा व मालमत्ता कर भरण्यासाठी अॅन्ड्रॉईड बेस्ड ॲप्लिकेशन विकसित करणे व त्याकरिता अँड्रॉइड बेस्ड टॅब संगणक पुरविणे.

६. बाहय यंत्रणेव्दारे (Outsourcing) कामे करुन घेणे.

७. नमुंमपाच्या आस्थापनेवरील 'सहाय्यक आयुक्त' या संवर्गातील अधिका-यांना "उपआयुक्त" या संवर्गात पदोन्नती देणे.

८. घणसोली विभागातील सुलाईदेवी डोंगर परिसर विकसित करणे.

९. घणसोली विभागातील मुंब्रादेवी डोंगर परिसर विकसित करणे.

१०. ऐरोली सेक्टर ०५ येथे नाटयगृह बांधणे.

११. नमुंमपाच्या प्रस्तावित सार्वजनिक रुग्णालय ऐरोली व माता बाल रुग्णालय बेलापूर करीता वैद्यकीय उपकरणे मध्यवर्ती रुग्णालयीन सेवा उपकरणे, हॉस्पीटल व ऑफीस फर्निचर खरेदी करणे.

१२. नमुंमपाच्या हद्दीतील टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रांतर्गत नॉर्थ सेंट्रल रोडची मुकूंद कंपनीपासून ते महापे-शिळ रस्त्यापर्यंत कॉंक्रीटीकरण करुन सुधारणा करणे कामामध्ये म.रा.वि.वि.कंपनीच्या भुमिगत वीजवाहिन्या स्थलांतरित करणे व नवीन दिवाबत्ती लावणे.

१३. नमुंमपाच्या हद्दीतील टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रांतर्गत ए आणि आर ब्लॉकमधील रस्त्यांची कॉंक्रीटीकरण/डांबरीकरण करुन सुधारणा करणे कामामध्ये म.रा.वि.वि.कंपनीच्या भुमिगत वीजवाहिन्या स्थलांतरित करणे व नवीन दिवाबत्ती लावणे.

१४. नमुंमपाच्या हद्दीतील टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रांतर्गत साऊथ सेंट्रल रोडची महापे जंक्शन ते फायझर रोडपर्यंत कॉंक्रीटींगने सुधारणा करणे कामामध्ये म.रा.वि.वि.कंपनीच्या भुमिगत वीजवाहिन्या स्थलांतरित करणे व नवीन दिवाबत्ती लावणे.

१५. ठाणे-बेलापूर रस्ता रबाळे पोलीस स्टेशन ते महापे नाका बस थांबा पर्यंत वार्षिक देखभाल करणे.

१६. ठाणे-बेलापूर रस्ता महापे बस थांबा ते तुर्भे पुलापर्यंत वार्षिक देखभाल करणे.

१७. ठाणे-बेलापूर रस्ता विटावा ते रबाळे पोलीस स्टेशन पर्यंत वार्षिक देखभाल करणे.

१८. घणसोली विभागातील गोठीवली स्मशानभुमी येथे संरक्षक भिंत बांधणे.

**ठरावाच्या सूचना :**

**१९ ते २१. सौ. स्वाती अशोक गुरखे (साटम), यांजकडून :-**

(१९) प्र. क्र. ८२, भारती विद्यापीठ प्राथमिक व माध्यमिक शाळेलगत बी १०/८ पर्यंत पदपथाची दुरुस्ती करणे, पदपथाची उंची व रस्त्याची लेवल एकच झाली असून ह्या रस्त्याला वाहतुकीची मोठी वर्दळ असून अवजड वाहने सुध्दा जात असतात. अवजड वाहनांच्या वजनाने फुटपाथ तुटू शकतात. तरी त्यांची उंची वाढवून दुरुस्ती करावी. (२०) प्र. क्र. ८२, से. १ अे, मँगो गार्डनच्या बाजूस असलेल्या पदपथ सी /५/२ च्या कॉर्नर पर्यंत चेकर्स स्टाईल मोठ्या प्रमाणात तुटलेल्या असून पदपथाची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. उपरोक्त विषयी पाहणी करुन पदपथ दुरुस्त करुन सुशोभिकरण करणे. (२१) प्र. क्र. ८२, पोलिस स्टेशनच्या बाजूने मँगो गार्डनच्या प्रवेश द्वारापर्यंत जाणारी पदपथ पूर्ण तुटलेली असून नागरीकांना जाण्यास मोठा अडथळा होत आहे. सदर पदपथाची दुरुस्ती करुन सुशोभिकरण करणे.

**२२ ते २४. सौ. राधा भुवन ठाकूर, यांजकडून :-**

(२२) प्र. क्र. ८५, मधील शहाबाज ते दिवाळे गावांच्या बाजूस असलेल्या मोठया नाल्याची संरक्षक भिंत जागोजागी ढासलेली असल्याने ती नविन बनविणे. (२३) प्र. क्र. ८५, मध्ये शहाबाज फणसपाडा मधील अंतर्गत गटाराची अवस्था बिकट असल्याने ती नविन बनविणे. (२४) प्र. क्र. ८५, मध्ये सेक्टर ११ मधील ज्योती फ्लाय ते सरोवर विहार पर्यंतची फुटपाथ नविन बनवून त्यावर इंटरलॉक बसविणे.

**२५ ते २७ श्री. रामआशिष राजबली यादव, यांजकडून :-**

(२५) प्र. क्र. ०६, मधील यादवनगर मेन रोड ते हनुमान मंदिर पर्यंत गटार बनविणे. (२६) प्र. क्र. ०६, मधील यादवनगर येथे पाच शौचालयाचे बॉन्ड्रीवाल बसविणे. (२७) प्र. क्र. ०६, मधील यादवनगर येथे हनुमान मंदिर परिसरात उघडया गटारावर स्लॅप टाकणे.

**२८ ते ३०. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(२८) नमुंमपा हद्दीतील सिडको वसाहतीमध्ये ज्याप्रमाणे मलनि:स्सारण वाहिन्या व पेवर ब्लॉकची कामे केली जातात त्याच प्रमाणे गावठाण विस्तार योजनेतील सोसायटयांमध्ये कामे करणे. (२९) प्र. क्र. ६५, जुईनगर मधील सेक्टर २३ येथील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १७ च्या कडेला असलेल्या फुटपाथवरील प्रशासनाने दिलेल्या टपऱ्या नागरिकांच्या हितासाठी इतरत्र हलविणे. (३०) प्र. क्र. ६५, जुईनगर मधील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १७ च्या मैदानाची व कुंपण भिंतीची सुधारणा करणे.

**३१ ते ३३. श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिस्ट, यांजकडून :-**

(३१) नमुंमपा क्षेतातील झोपडपट्टी विभागात खाजगी सहभागातून बांधण्यात येणाऱ्या शौचालयास नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे शौचालयाकरिता बांधण्यात येणाऱ्या खर्चाचे खाजगी सहभागातून जे शौचालय बांधण्यास येणाऱ्या खर्चाचे त्यांना ५० टक्के अनुदान नमुंमपातर्फे देणे. (३२) नमुंमपाच्या आस्थापनाद्वारे होणाऱ्या नोकरभरती मध्ये ५० टक्के नवी मुंबईतील करदाताकरिता राखीव जागा ठेवणे.

(३३) प्र. क्र. ०५ मध्ये एम.आय.डी.सी रोड ते इलठण स्मशानभुमी पर्यंत येण्या-जाण्यासाठी कच्चा रस्ता आहे, तो कच्चा रस्ता मालकी हक्काचे असल्याकारणाने तेथे नवी मुंबई महानगरपालिकेद्वारे रोड बनविण्यास (डांबरी) अडथळा निर्माण होत आहे. तरी सदरची जागा मालकाकडून विकत घेऊन लोकांच्या सुविधा करिता डांबरी रोड बनविणे.

**३४ ते ३६. श्री. प्रभाकर गोमा भोईर, यांजकडून :-**

(३४) प्र. क्र. ४५, जुहूगांव येथील नव्याने बांधलेल्या गावदेवी मैदानामधील गटर बंदिस्त करणे. (३५) प्र. क्र. ४५, जुहूगांव शाळा क्र. २९ कै. रामा नामा भोईर विद्यालय या वरती एक मजला वाढविणे. (३६) प्र. क्र. ४५, जुहूगांव येथे पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या ग्रामपंचायत काळातील असलेल्या इमारतीची नव्याने बांधणी करणे.

**३७ ते ३९.सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून:-**

(३७) प्र. क्र. २१, घणसोली विभागाची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. लोकसंख्येबरोबर गुन्हयांच्या संख्येमध्येही झपाटयाने वाढ होत आहे, यामुळे विभागात नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. या सर्व घडामोडींवर नियंत्रण आणण्यासाठी संपुर्ण प्रभागात घणसोली गाव, नोड, तळवली गाव, नोसिलनाका, राबाडा आणि गोठिवली येथे आवश्यक तेथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे. (३८) प्र. क्र. २१, अंतर्गत तळवली गांव येथे सांस्कृतिक कार्यक्रम व लग्न समारंभ विविध कार्यक्रम करण्यासाठी एकही व्यासपिठ उपलब्ध नाही. तरी या प्रभागात रहिवाशांच्या सोयीकरिता समाजमंदिर व बहुउद्देशीय इमारत बांधणे. (३९) प्र. क्र. २१, अंतर्गत तळवली गांवातील मराठी शाळेजवळ व नामदेव पाटील चाळ या दोन्ही ठिकाणी हायमास्ट लावणे.

**४० व ४१.श्री. वैभव नारायण गायकवाड, यांजकडून :-**

(४०) प्र. क्र. ५३, वाशी येथील शांतीनिकेतन सोसायटी ते इ.एस.आय.एस वसाहत लगत असलेल्या पावसाळी गटाराची दुरावस्था झालेली आहे, बऱ्याच ठिकाणी मोठे खड्डे पडलेले आहेत. तरी संबंधित ठिकाणी पावसाळी गटार बनविणे. (४१) प्र. क्र. ५३, अंतर्गत होल्डींग पॉन्डची साफसफाई न केल्यामुळे होल्डींग पॉन्डमध्ये गाळ साचलेला आहे. होल्डींग पॉन्डमधील गाळ काढला न गेल्यामुळे त्यातील पाण्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे, दरवर्षी पावसाळा सुरु होण्याच्या अगोदर होल्डींग पॉन्डमधील गाळ काढून स्वच्छ करणे आवश्यक आहे. तरी होल्डींग पॉन्ड स्वच्छ करुन त्यातील गाळ काढणे.

**४२ व ४३. श्री. विक्रम धनाजी शिंदे, यांजकडून :-**

(४२) प्र. क्र. ५१, वाशी सेक्टर-१६ए मधील कर्मवीर भाऊराव पाटील उद्यान तसेच संत ज्ञानेश्वर उद्यानामध्ये अत्याधुनिक पध्दतीची दिवाबत्ती बसविणे. (४३) प्र. क्र. ५१, वाशी प्रभागातील संपुर्ण पदपथ नविन बसविणे.

**४४ व ४५.सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-**

(४४) नवी मुंबईतील स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे कैवारी, नवी मुंबईचे खरे खुरे शिल्पकार, लोकनेते, मा. विरोधी पक्षनेते, मा. खासदार स्वर्गीय दि.बा.पाटील हयांनी नवी मुंबईतील प्रकल्पग्रसतांना खऱ्या अर्थाने न्याय मिळवून दिला. आज त्यांच्याचमुळे आगरी समाज हा नवी मुंबईत ताट मानेने उभा आहे. त्यांच्या कार्याच्या गौरव व्हावा या दृष्टीकोनातून बेलापूर किल्ल्याजवळील उरण फाटा येथे स्वर्गीय दि.बा.पाटील हयांचे स्मारक उभारणे. (४५) नवी मुंबईतील स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कवडीमोल भावात संपादित करुन, नवी मुंबईतील बहुतांशी प्रकल्पग्रस्तांना भुमिहीन बनवले. ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या, त्यांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी अल्पदरात शासन निर्णयानुसार १०० चौ.मी. भुखंड देण्यात येत आहे. परंतू शासन दरबारी या भुखंडाची किंमत जरी अल्प असली तरीही नवी मुंबई महानगरपालिकेच्या वार्षिक मालमत्ता कर भुखंड किंमतीच्या जवळ जवळ ५० % आहे. त्यामुळे हा कर म्हणजे प्रकल्पग्रस्तांकरिता जिझिया करच असल्याने निदर्शनास येत आहे. तरी जे प्रकल्पग्रस्त त्यांना दिलेल्या भुखंडात स्वत:च व्यवसाय करत आहेत अथवा सदर भुखंड विकसित करुन भाडेतत्वावर देऊन आपला उदरनिर्वाह चालवित आहे, त्यांना त्यांच्या मालमत्ता करात सुट देणे.

**४६ ते ४८. सौ. विजया रामचंद्र घरत, यांजकडून :-**

(४६) नमुंमपाच्या नियोजन धोरणानुसार महापलिकेच्या मालमत्ता काही संस्थांना, महिला मंडळांना भाडेतत्वावर दिल्या गेल्या आहेत. त्यापैकी शांता महिला मंडळ तुर्भेगांवातील प्रकल्पग्रस्तांचे असून नव्या मुंबईतील सर्वात जूने मंडळ आहे. सदर महिला मंडळाला प्लॉट क्र.३३७ वरील मालमत्ता तुर्भे ग्रामपंचायतीने कायमस्वरुपी वापरास दिली होती. सदर मालमत्ता आता पालिकेकडे वर्ग झाली आहे. तरी केंद्र व राज्य सरकारच्या ध्येय धोरणानुसार महिलांचे सबलीकरण, सक्षमीकरण करणेकरिता सदर मालमत्ता शांता महिला मंडळाला कायमस्वरुपी नाममात्र अनामत व भाडे आकारुन देणे. (४७) प्र. क्र. ५८, तुर्भेगांव मधील पंडित अनंत पाटील ते दिनकर नागा भोईर (प्लॉट क्र. १४९) यांचे घरापर्यंतचा शितलादेवी मार्गावरील रस्त्याचे डांबरीकरण करणे. (४८) प्र. क्र. ५८, तुर्भेगांव मधील पोस्ट ऑफिस ते यशवंत बाळू पाटील (प्लॉट क्र. १७९) या लक्ष्मण हिरा पाटील मार्गावरील रस्त्याचे डांबरीकरण करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ०५ जुलै २०१३.**